पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणातील अधिकारी/ कर्मचाऱ्यांना ७ वा वेतन आयोग लागू करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
शासन निर्णय क्र.एमसीओ-२०१९/प्र.क्र.१८३/नवि-१४
मंत्रालय, मुख्य इमारत (४ था मजला),
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा रोड,
मुंबई ४०० ०३२.
दिनांक २० सप्टेंबर, २०१९.

<u>संदर्भ:</u>-१. शासन अधिसूचना वित्त विभाग क्र.वेपुर २०१९/प्र.क्र.१/सेवा-९, दि.३०.०१.२०१९.
२. मुख्य कार्यकारी अधिकारी, पिंपरी-चिंचवड नवनगर प्राधिकरण यांचा दि.०५.०३.२०१९ रोजीचा प्रस्ताव व दि.२२.०२.२०१९ च्या प्राधिकरण सभेची मंजूरी.

<u>प्रस्तावना</u>: -

संदर्भ क्र.२ अन्वये पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणामधील अधिकारी/ कर्मचाऱ्यांना राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे ७ व्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतनश्रेणी लागू करण्याचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला होता.

सदर प्रस्तावात नमुद पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाची वित्तीय स्थिती, अतिरिक्त दायित्व, आस्थापना खर्च विहीत मर्यादेत असल्याची बाब, अतिरिक्त दायित्व भागविण्याबाबतची तरतूद तसेच, आकृतीबंधाचा तपशील नमुद करण्यात आला आहे. तसेच, राज्य शासनाचे कोणतेही अनुदान देय नाही. उपरोक्त बाबी तसेच, यापूर्वी सहाव्या वेतन आयोग लागू करण्यास देण्यात आलेली शासन मान्यता विचारात घेऊन, पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणामधील अधिकारी/ कर्मचाऱ्यांना राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे ७ व्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतनश्रेणी लागू करण्याचा मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुषंगाने, खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

<u>शासन निर्णय</u>: -

पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणामधील अधिकारी/ कर्मचाऱ्यांना ७ व्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतनश्रेणी दि.०१.०१.२०१६ पासून लागू करण्यास व प्रत्यक्ष वेतन दि.०१.०९.२०१९ पासून देण्यास खालील अटींच्या अधीन राहून मान्यता देण्यात येत आहे: -

(१) ७ वा वेतन आयोगानुसार निश्चित करण्यात येणाऱ्या वेतनश्रेणी, राज्य शासनाकडील संबंधित समकक्ष पदांना लागू करण्यात आलेल्या वेतनश्रेणीपेक्षा अधिक असणार नाहीत. तसेच, प्राधिकरणातील अधिकारी/ कर्मचाऱ्यांना ६ व्या वेतन आयोगानुसार मंजूर वेतनश्रेणीशी समांतर ७ व्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतनश्रेणी लागू होतील. सुधारित वेतनश्रेणीत प्राधिकरण कोणतीही वाढ करणार नाही.

(२) वेतनश्रेणीबाबत समकक्षता ठरविताना काही अडचणी आल्यास, त्याचे शासनाच्या पूर्वमान्यतेने निराकरण करण्यात यावे.

(३) ७ व्या वेतन आयोगाचा लाभ केवळ मंजूर पदांवरील कार्यरत अधिकारी/ कर्मचारी यांना देण्यात यावा.

(४) प्राधिकरणांतर्गतची विकास कामे, विकास कामांसाठी घेतलेले कर्ज आणि व्याज यांच्या परतफेडीसाठी पुरेसा निधी शिल्लक राहील यांची खात्री करावी.

(५) प्राधिकरणाने उत्पन्न स्त्रोतात वाढ करुन, त्यांचा आस्थापना खर्च निरंतर ३५% या विहीत मर्यादेत राहील, याबाबत उपाययोजना करणे अनिवार्य असेल.

(६) दि.०१.०१.२०१६ ते दि.३१.०८.२०१९ या कालावधीतील थकबाकीची रक्कम अदा करण्याबाबत प्राधिकरणाने आर्थिक स्थिती विचारात घेऊन, थकबाकी देण्याचा निर्णय घेतल्यास, राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना ज्या प्रकारे ५ टप्प्यांमध्ये थकबाकीची रक्कम देण्यात येणार आहे. त्याच धर्तीवर देण्याची दक्षता घ्यावी.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०९२०१०५१२०३६२५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Sanjay S Gokhale

Digitally signed by Sanjay S Gokhale
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Urban Development, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ab8a7eeedad158d24cf530f0d6b662808245be49a8459ed4c63961ebdc3cb961, cn=Sanjay S Gokhale
Date: 2019.09.21 11:52:57 +05'30'

(सं.श.गोखले)
शासनाचे सह सचिव

प्रत: -

१. मा.मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा.राज्यमंत्री, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
३. प्रधान सचिव (नवि-२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मंत्रालय, मुंबई.
५. सह / उप सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. मुख्य कार्यकारी अधिकारी, पिंपरी-चिंचवड महानगर विकास प्राधिकरण, पुणे.
७. निवडनस्ती (नवि-१४)